# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.09.2024** **वार – शनिवार**

---

**रेबीज**

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार रेबीजमुक्त पुण्यासाठी आजपासून पुढील 15 दिवस  लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. जागतिक रेबीज लसीकरण दिवस 28 सप्टेंबर रोजी पाळला जातो. त्यानिमित्त भटक्या, मोकाट आणि पाळीव कुत्र्यांसाठी पुणे मनपा श्वानपथक, युनिव्हर्सल ऍनिमल वेल्फेअर सोसायटी या संस्थांमार्फत मोफत रेबीज लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागानं दिलेल्या माहितीनुसार महापालिकेनं यावर्षी एप्रिल ते जुलै या चार महिन्यांत 18 हजार 824 भटकी आणि मोकाट कुत्री पकडून त्यांच्यावर नसबंदी शस्त्रक्रिया केली आहे, तर 3145 भटक्या कुत्र्यांना रेबीजची लस देण्यात आली आहे.   गेल्या आथिक वर्षात 64 हजार 730 भटक्या कुत्र्यांना रेबीजचं लसीकरण करण्यात आलं असल्याची माहिती महापालिकेच्या पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर सारिका फुंडे यांनी दिली.

**कात्रज**

पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाची यशस्वी वाटचाल सुरू असून संघ सातत्यानं दूध उत्पादकांच्या हिताचे निर्णय घेत आहे. दूध उत्पादक शेतकऱ्यांनीही संघाला सहकार्य करणं गरजेचं आहे  असं मत पुणे जिल्हा दूध संघाचे अध्यक्ष भगवान पासलकर यांनी पासष्ठाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना व्यक्त केलं. गेल्या आर्थिक वर्षाचं व्यापारी आणि नफातोटा पत्रक, नफा वाटणी, वार्षिक तसंच लेखापरीक्षण अहवाल,  आणि अंदाज पत्रक यावेळी सादर करण्यात आलं. नवीन दूध आणि दुग्धजन्य पदार्थ उत्पादनांकरिता आधुनिक यंत्रांसह प्रकल्प उभारणी आणि नवीन प्रशासकीय इमारत बांधणं, दूध पुरवठा बंद असलेल्या संस्थांचं सभासदत्व रद्द करणं, लेखापरिक्षकांची नेमणूक आदी निर्णय सभेत घेण्यात आले. या आर्थिक वर्षात संघाला 3 कोटी 1 लाख 57 हजार रुपये निव्वळ नफा झाला आहे.

**वसुंधरा**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्यात आलेल्या चतुर्थ माझी वसुंधरा अभियानात 10 लाखांपेक्षा जास्त लोकसंख्येच्या अमृत गटात पिंपरी चिंचवड महापालिकेनं आठ कोटी रुपयांचं प्रथम पारितोषिक मिळवलं. विद्युत वाहनांना प्रोत्साहन, नदी, तळे आणि नाले यांचं पुनःजिविकरण, रोप वाटिकांची निर्मिती, जुन्या हरित क्षेत्रांचं संवर्धन आणि देखभाल या निकषांवर हे पारितोषिक देण्यात आलं.

**लघुपट**

जागतिक पर्यटन दिनानिमित्त राज्याचं पर्यटन संचालनालय आणि परभन्ना फाउंडेशन यांच्याद्वारे आयोजित तिसऱ्या राष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवात 'मायेचं पांघरूण' या लघुपटानं, तर 'सितार मेकर ऑफ मिरज' या माहितीपटानं काल बाजी मारली. लघुपट, माहितीपट, व्ही-लॉग अशा तीन प्रकारात हा महोत्सव झाला. पर्यटन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल पर्यटनतज्ज्ञ डॉक्टर विश्वास केळकर यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र पर्यटन विशेष ठरलेल्या 'मायेचं पांघरूण'ला 10 हजारांचं रोख पारितोषिक आणि इतर सर्व विजेत्यांना मानचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आलं.

**पर्यावरण**

पर्यावरणाचं संतुलन राखण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीनं विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. हवामानाचा शहरातील विविध घटकांवर होणारा परिणाम लक्षात घेता विविध उपाययोजना आणि उपक्रम राबविण्याच्या दृष्टीनं महापालिकेनं हवामान विषयाला विशेष स्थान दिलं असून महापालिकेच्या पुढील वार्षिक अंदाजपत्रकामध्ये हवामान अंदाजपत्रकाचा स्वतंत्रपणे समावेश करण्यात येत आहे, अशी माहिती प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. हवामान अंदाजपत्रकाबाबत माहिती देताना महापालिकेचे वित्त संचालक प्रवीण जैन म्हणाले की, हवामान अंदाजपत्रक  संकल्पनेसंदर्भात खाजगी संस्थेमार्फत अभ्यास करण्यात येऊन सूचना घेण्यात आल्या आहेत.

**सांस्कृतिक**

हिंदुस्तानी शास्त्रीय गायिका डॉक्टर अर्चना सहकारी यांचं गायन तसंच ओडिशी नृत्यांगना मौमिता वत्स घोष यांच्या नृत्य सादरीकरणानं पुणेकर रसिकांना काल अनोख्या मैफिलीचा आनंद घेता आला. भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या पुणे विभागीय कार्यालयातर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.  ज्येष्ठ गायक पंडित सुहास व्यास यावेळी प्रामुख्यानं उपस्थित होते.

**लता**

स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या 95 व्या जयंतीनिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रमांद्वारे त्यांचं स्मरण करण्यात येत आहे. 28 सप्टेंबर 1929 रोजी जन्मलेल्या, लतादिदींचा आवाज, 70 वर्षांहून अधिक काळातील उल्लेखनीय कारकीर्द आणि विविध भाषांमधील पंचवीसहजारहून अधिक गाण्यांचा विस्मयकारक संग्रह यासह, कलाकारांच्या नवीन पिढ्यांना प्रेरणा देत आहे. लतादिदींचं 6 फेब्रुवारी 2022 या दिवशी मुंबईत निधन झालं.

**बर्फी**

येरवडा परिसरातील मिठाईच्या दुकानाचं कुलूप तोडून चोरट्यांनी रोख रक्कम आणि अडीच किलो आंबा बर्फी चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत मिठाई विक्रेते सैतानसिंग देवडा यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

**क्रिकेट**

कानपूर कसोटीत आज दुसऱ्या दिवशी पावसामुळं एकही चेंडू टाकता आला नाही. प्रथम फलंदाजी करताना पाहुणा बांग्लादेश संघ अद्याप 3 गडी बाद 107 धावांवर आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**